# गोंड : पूर्व इतिहास

संशोधनकर्ता
**लक्ष्मण गोरे**

भारतात आर्येत्तर जमतीपैकी गोंड ही एक महत्वाची जमात होती. त्यांची संस्कृती विविधतेने नटलेली होती. परंपरा, रूढी, रितीरिवाजांना अनुसरून त्यांची जीवन पद्धती होती. स्वत:चे सामाजिक आणि सांस्कृतिक तत्वज्ञान आणि राज्यशासन पद्धती होती. त्यांचे सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन पुढारलेले होते. गोंड जमातीच्या उत्पत्ती बाबत निश्चित असे एक मत नाही. परंतु गोंड जमातीचे लोक स्वत:स कोया किंवा 'कोयतूर' म्हणून घेत होती. गोंड जमातीच्या उत्पत्ती बाबत अनेक लोककथा प्रचलित होत्या. गोंड ही एक सलग जमात नसुन ती एक व्यापक जमात होती. त्यात अनेक उपजातींचा समावेश होत होता. गोंड जमात ज्या भूप्रदेशावर बहुसंख्येने राहत होता त्यावर अनेक शतके राज्य केले त्या भूप्रदेशाला 'गोंडवन' असे म्हटले जाते.

गोंड ही एक आदिवासी जमात आहे. गोंड जमातीचे वास्तव्य अतिप्राचीन काळापासुन या भागात होते. नर्मदेपासुन दक्षिणेस गोदावरीपर्यंत व पूर्वेस छतिसगडपासून पश्चिमेस खानदेशापर्यंत या राज्यात विस्तार होता. गोंड हे नाव तेलगु लोकांनी दिले असावे. गोंड जमातीने गढा मंडला, देवगड, खेरला व चांदागड या ठिकाणी आपले राज्य निर्माण केले. गोंड जमातीचे सांस्कृतिक जीवन वैशिष्टयपूर्ण होते.

आजही विदर्भातल्या इतर कोणत्याही भागापेक्षा भंडारा आणि चंद्रपूर जिल्ह्यात आदिवासींची संख्या जास्त आहे हे लक्षात घेतले पाहिजे. याच्या पश्चिमेकडे लागून असलेल्या नागपूरच्या पठाराचा प्रदेश लोखंड, कोळसा आणि मॅगेनीज यांच्या साठयाने परिपूर्ण असल्याने त्या पठारावर इ. स. पूर्व आठव्या व नवव्या शतकात महापाषाणयुगीन लढवय्ये आणि कारागीर विशेषत: लोहार आणि तांबट याची वस्ती झाली. वर्धा आणि पूर्णा खोऱ्यात शेतीला योग्य अशी मैदाने असल्याकारणाने नागरी स्वरूपाच्या वस्त्या झाल्या. वऱ्हाडात किंवा विदर्भात मूळ कोणत्या लोकांची वस्ती होती? हा प्रश्न अजून पूर्णपणे सुटलेला नाही. डॉ. जयस्वाल आणि डॉ. आंबेडकर यांच्या मते या भागात प्राचीन काळी नागा लोकांची वस्ती होती. त्यानंतर गवळी लोकांची वस्ती आणि लहानलहान राज्ये असल्याचे पुरावे आहेत. नागपूरला गवळी राजांची सनद उपलब्ध झालेली आहे. आज या जुन्या संस्कृतिचे वारसदार म्हणून गोंड, कोरकू, कोलाम, भिल्ल या जाती दाखविण्यात येतात.[१] गोंड जमातीमध्ये जी समाजरचना आढळून येत होती ती विशेषत: देव पद्धतीवर आधारीत होती. या देवपद्धतीला अनुसरूनच गोंड जमातीचे सामाजिक रितीरिवाज पार पडत होते. गोंड जमातीत देवपद्धती कशी व कोणी निर्माण केली त्याविषयीची माहिती गोंड जमातीच्या धर्मकथेत आढळून येते. देवपद्धतीवर आधारीत गोंड जमातीची सामाजिक रचना अतिशय वैशिष्ठ्यपूर्ण होती. गोंड जमातीची सामाजिक व्यवस्थेत सामाजिक नितिनियमांचे पालन करणे सर्वांना बंधनकारक होते.

गोंड जमातीचा धर्म हा प्रथा परंपरा व धार्मिक विचारांवर आधारलेला होता. गोंड जमातीच्या धर्माचे दर्शन त्यांचे देव, उत्सव, लोकगीते आणि लोककथा यांच्यातुन होते. गोंड लोकांची देवावर फार श्रद्धा होती. दैवीशक्तीशिवाय कोणतीच गोष्ट होत नाही असा त्यांचा समज होता. गोंडी भाषेत देव शब्दासाठी 'पेन' हा शब्द रूढ होता. देवतांची पुजा पद्धती अतिशय काटेकोरपणे केली जात होती. देवतांची पुजा करण्यासाठी प्रत्येक गावात किंवा काही गावांचे मिळून भुमका, पेरमा, पुजारी इ. व्यक्ती होते. या व्यक्तींच्या मार्फत गोंड जमातीचे लोक वेगवेगळ्या देवतांची पुजा करीत

होते. त्यांचे देव निसर्गातच होते. गोंड जमातीचा मुख्य देव 'पेरसापेन' होता. त्यास ते सृष्टीनिर्माता मानित होते. गोंड जमातीच्या सम्पूर्ण जीवनावर धर्माचा पगडा होता. गोंड जमातीचे सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण होते.

**गोंड जमातीची पार्श्वभूमी**

आदिवासी जातीपैकी गोंड ही एक महत्वाची जात आहे. भारतात आर्य लोकांच्या पूर्वी राहणाऱ्या ज्या मूळच्या जमाती होत्या त्यातीलच गोंड ही एक जमात आहे.[२] आर्यांचे हिन्दुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मूळ निवासी होते. ह्या भूमीचे आदिपूत्र होते. विविधतेने नटलेली समृद्ध संस्कृती होती. विकसित बोलीभाषाही होती. एकूणच हे आदिवासींचे जीवन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकिय दृष्टया समृद्ध आणि पुढारलेले होते.[३]

आर्यांचे भारतात आगमन झाल्यावर त्यांच्या वसाहती उत्तर व दक्षिण भारतात पसरल्या त्यांना येथे राहत असलेल्या असूर, नाग, द्रविड व वन्य जमाती यांच्याशी सामना करावा लागला. त्यांनी काहीना नष्ट केले. पण ते संख्याबळाने, साधनसामुग्रीने वरचढ नव्हते त्यांना डोंगरदऱ्यांचा, जंगलाचा आश्रय घ्यावा लागला. वेदकालीन अनार्य, दास, दस्यु, पणी, कुयव अशा नावांनी ओळखल्या जात होते. रामायणात त्याच लोकांना 'राक्षस' या नावानी ओळखल्या जात होते. त्यापैकीच 'कुयव' म्हणजे गोंड जमातीचे लोक असावेत.[४]

**गोंड शब्दाची उत्पत्ती**

गोंड हे या जमातीचे नाव कसे पडले असावे हा प्रश्न आहे. गोंड शब्दाच्या उत्पत्तीबाबत निश्चित असे एकमत नाही. भारतातील ज्या जमातींना आदिवासी म्हणून ओळखल्या जाते त्यापैकी गोंड ही एक जमात होय. ती एक आदिवासी जमात असून द्रविडीयन वंश गटातील मानली जाते. गोंड ही एक जात नसून तो एक अनेक उपजाती मिळून बनलेला समाज आहे. सध्या व्यवहरात कागदोपत्री गोंड असा उल्लेख असला तरी ते स्वत:स 'कोया' किंवा 'कोयतूर' म्हणवून घेतात. गोंड हे नाव मुगल काळातील आईने अकबरी ग्रंथात आढळते. तेलगू भाषेत 'कोंडा' याचा अर्थ पहाड पर्वत असा होतो. पर्वत पहाडाच्या आश्रयाने राहणाऱ्या व विशिष्ट वन्यधर्माचे आचरण करणाऱ्या लोकास तेलगू लोक 'कोंड' म्हणू लागले. त्याचाच अपभ्रंश 'गोंड' असा झाला असावा.[५] 'कोंड' या तेलगू शब्दाचा अर्थ पहाड असा होतो. याचाच अपभ्रंश होऊन गोंड हे नाव पहाडी प्रदेशात राहणाऱ्या लोकांना मिळाले असावे.[६] अशा प्रकारे शब्दाच्या आधारावर गोंड ही पहाडी जमात दिसून येते. अशाच आशयाने विवेचन दिनबंधू जुलमे यांनी 'माणिकगड, गडचांदूरचा प्राचिन इतिहास'[७] या पुस्तकात केले आहे.

हिस्लॉप प्रतिपादन करतो की 'गोंड' हा शब्द कोंड या शब्दाचे रूप आहे. खोंड जमातींचा उच्चार सुद्धा तो अशाच प्रकारे करतो. हिस्लॉप पुढे म्हणतो की, तेलगू लोक खांडे या शब्दाचा 'गोंड' किंवा 'खोंड' असा उल्लेख करतात. रसेल यांनी या जमातीला गोंड हे नाव हिंदू किंवा मुसलमानांनी दिले[८] असे म्हटले आहे. महाराष्ट्र राज्याच्या वर्धा जिल्हा गॅझेटिअरमधील माहितीसाठी रसेल यांच्या ग्रंथाचा आधार घेतला असून त्यात ते म्हणतात की, गोंड ही संज्ञा तेलगू लोकांनी प्रचलित केल्याची जास्त शक्यता आहे. गोंड शब्दाबाबत डॉ. जी. ए. ग्रीयर्सन लिहीतात की,

"The words Gond occurs in the works of Sanskrit exicographers like Hemchandra as term do nothing a low-tribe. The Gonds have given their name in the tract of Gondwwana, which corresponds to the greater part of what is how central provinces."[९]

**गोंड जमातीतील उपजाती**

गोंड ही एक सलग जात नसून तो एक व्यापक समाज आहे. विनायक तुमराम यांनी आपल्या ग्रंथात गोंडाच्या अठ्ठावीस उपजमातीचा उल्लेख केला आहे. त्या पुढीलप्रमाणे आहे. राजगोंड, माडिया गोंड, धुर गोंड, नाईक गोंड, कोरकू गोंड, गायत्या गोंड, परधान गोंड, कोल गोंड, नागसीया गोंड, खारिया गोंड, ओझा गोंड, भुईया गोंड, भैना गोंड, कोयतूर गोंड, कुरूक गोंड, मझवार गोंड, भंत्रा गोंड, बिंझवार गोंड, कंडरी गोंड, कोपा गोंड, नागरची गोंड, धनवार गोंड, कलंग गोंड, कान्ध गोंड, कुई गोंड बैगा गोंड, मांझी गोंड, अगारिया गोंड इत्यादी.

ह्या जमातीपैकी गोंड, राजगोंड, मारिया गोंड, परधान गोंड हे नागपूर जिल्ह्यात आढळतात. हिस्लॉप यांच्या मते, गोंड हे स्वत:ला साडेबारा जातीत मोडतात. ते म्हणतात गोंडामध्ये राजगोंड, राजवाल, दडवे, खटोल्या, पाटाळ, ढोली, ओझ्याल, कोईबुटूल, कोईकोपाल, कोलाम, मडियाल आणि गौण दर्जा असलेली आणि पाटाळासारखी भासणारी अर्धी जमात साडेबारा जाती गोंडात आहे.[१०] गोंड, राजगोंड, माडिया गोंड व तुरळक प्रमाणात कोरकू गोंड ह्या जातीच दक्षिण गोंडवनात आहेत. गोंडापैकी ज्यांनी राज्य स्थापन केली, जमीनदाऱ्या मिळविल्या ते आपणास राजगोंड म्हणवु लागले.

**गोंड जमातीचे वस्तीस्थान**

गोंड जमात ज्या भूप्रदेशावर बहुसंख्येने वसली तिथे त्यांनी अनेक वर्ष राज्य केले त्या भूप्रदेशाला गोंडवन ह्या नावाने ओळखले जाते. भौगोलिक दृष्टया हा प्रदेश नर्मदेपासून दक्षिणेस गोदावरीपर्यंत व पूर्वेस छत्तीसगड पासून पश्चिमेस खानदेशापर्यंत पसरला आहे. एवढ्या विशाल प्रदेशात अतिशय घनदाट जंगले होती. अशा या अरण्यमय प्रदेशात राहत असलेल्या गोंड जमातीच्या नावावरून त्याला गोंडवन हे नाव पडले असावे. असा विचार अनेक विद्वानांनी मांडला आहे. गोंडवन ह्या शब्दाच्या उत्पत्ती विषयी विद्वानांमध्ये मतभेद आढळून येतात. गोंडवन म्हणजे गोंड राहत असलेला अरण्यमय प्रदेश होय. गोंडवन हे विशेषनाम म्हणुन वापरतात.

जेव्हा मुगल शासकांनी दक्षिण भारताकडे लक्ष दिले तेव्हा मध्यभारतात अनेक गोंड शासकांचे गढ मिळाले, म्हणुनच मुगल इतिहासकारांनी या भूखंडाचे नाव 'गोंडवन' ठेवले. 'गोंडवन' हे नाव उत्तर भारताकडील मुसलमान राज्यकर्त्यांनी दिलेले आहे.

गोंडवन मध्ये सातपुडा पठार, नागपूर विभागातील मैदानी भाग आणि नर्मदा खोऱ्यापासून दक्षिण—पश्चिमेचा प्रदेश समाविष्ट आहे.[११] भारतातील आदिवासी जमातीमध्ये गोंड जमात संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, बिहार व महाराष्ट्र या राज्यात गोंड आढळतात. गोंडाचे मूळ वसतीस्थान कोणते याबद्दल विद्वानामध्ये एकमत नाही. परंतु गोंड हे दक्षिणेकडून मध्यप्रांतात आले असावे. रसेल आणि हिरालाल यांच्या मते इ. स. नवव्या ते तेराव्या शतकाच्या दरम्यान गोंड लोक गोंडवनात दक्षिणेकडून मध्यप्रांतात आले असावे. गोदावरी ओलांडून ते चंद्रपूर व तेथून ते इंद्रावती पार करून बस्तर आणि छत्तीसगडच्या दक्षिण आणि पूर्वेकडील डोंगराळ भागात गेले असावे आणि वर्धा व वैनगंगा ओलांडून सातपुडा भागात गेले असावे.

श्री. सी. एस. व्यंकटचार यांच्या Survey of Migration of Castes and Tribes in the Central Indian and their Distribution च्या तिसऱ्या भागात लिहितात की, गोंड हे कदाचित द्रविडपूर्वीचे दक्षिणेकडील लोक असावेत ज्याच्यावर द्रविडांनी त्यांची भाषा लादली आणि मद्रासच्या उत्तरपूर्व भागातील काही कारणामुळे ही जमात भारताच्या मध्ये भागातील दुर्गम प्रदेशात स्थायिक झाली इंद्रजित सिंग यांनीही या मताला दुजोरा दिला आहे.[१२]

मध्य भारतात गोंडाचे वास्तव्य फार प्राचिन असावे त्यांच्या प्राचिन अस्तित्वाविषयी आणि भारतीय संस्कृतितील त्यांच्या योगदानाविषयी पुरातत्व विभागाचे संचालक हंसमुख सांकलिया म्हणतात, 'जी भारतीय संस्कृती म्हणजे त्यात आदिवासी गोंडाचे एक महत्वाचे स्थान आहे आणि ते आतपर्यंत आपण ओळखू शकलो नाही. गोंड हे कमीत कमी २००० वर्षापासून मध्यभारतात राहत असावेत.[१३]

भूगर्भ शास्त्रानुसार विंध्याचल पर्वत ही भारताची सर्वात प्राचिनतम पर्वतश्रेणी आहे. गोंड याच प्रदेशात राहत असावेत. म्हणून मानवशास्त्रज्ञ यांना भारताची सर्वात प्राचिन आदिवासी जमात मानतात. पुराणात व स्मृतीग्रंथात यांचा उल्लेख आहे.[१४] भूगर्भशास्त्राज्ञांच्या अनुसार ते विंध्याचलचे मुळ निवासी आहेत. तर मानवंश शास्त्राज्ञांच्या मतानुसार ते भारताचे अतिप्राचिन निवासी आहेत.

इरावर्ती कर्वे गोंड जमातीबद्दल लिहतात गोंड ही हिंदुस्थानातील एक महत्वाची, संख्येने मातब्बर व मोठ्याप्रदेशात पसरलेली वन्य जमात आहे. मध्यप्रदेशात गोंडाची वस्ती नाही असा एकही जिल्हा नाही.[१५] गोंड मध्यभारतात येण्याच्या अगोदर

जबलपूर, भांदक, रत्नपूर येथे इ. स. ६ व्या ते १२ व्या शतकापर्यंत राजपूत राजघरणी राज्य करीत असावीत. परंतु इ. स. बाराव्या ते चौदाव्या शतकाच्या दरम्यानही राजघराणी व दक्षिणेकडील देवगिरीचे यादव आणि वारंगळच्या काकतियांची सत्ता पावताच निर्माण झालेली सत्ता पोकळी भरून काढण्यासाठी गोंडवनातील बैतूल, देवगड, छिंदवाडा, जबलपूर, चांदा आणि भांदक या प्रदेशावर गोंड पसरले असावेत असे वाटते.[१६] याशिवाय काही विद्वानांच्या मतानुसार गोंड अनंत काळापासून मध्य भारताचे निवासी असावेत असा ही तर्क लावला जातो.

**गोंडी भाषा**

गोंड बोलतात ही गोंडी भाषा होय. या भाषेला लिपी नाही. ही द्रविड भाषा होय व ती तेलगू कानडी भाषांची बहीण आहे. असे अनेक विद्वान समजतात. हा समज पाश्चात्यांनी रूढ केला पण ते बरोबर नाही. गोंडी ही द्रविड भाषा नव्हे. गोंडी ही प्रादेशिक सानिध्यामुळे तिच्यात मराठी, हिन्दी, तेलगू, कानडी भाषा घुसले आहेत व अशी मिश्रित भाषा हल्ली प्रचलित आहे.[१७] असे मत इतिहासकार अ. ज. राजुरकर मांडतात. मात्र गोंडी भाषा ही प्राचिनतम असल्याचे पुरावे अलिकडेच हाती आले आहेत. न्यायमुर्ती रानडे, पत्रदार हेरास आणि काल्डवेल ह्या थोर विद्वानांनी गोंडी ही प्राचीन तामिळ असल्याचे म्हटले आहे. ती द्रविड भाषा समुहातील असल्याचा उल्लेख चंद्रपूर डिस्ट्रीक्ट गॅझेटिअरमध्ये सुद्धा सापडतो. हेच मत पाश्चात्य विद्वान रसेल, हिरालाल स्टेफन ह्यांनाही मान्य असल्याचे त्यांच्या ग्रंथ संपदेवरून दिसुन येते.[१८] ग्रिर्यसन यांनी आपल्या भारतातील भाषिक पाहणीवरील पुस्तकात गोंडी भाषेचा विचार केला असुन तिचे नाते द्रविड समुह वंशासी असल्याचे म्हटले आहे. वर्धा जिल्हा गॅझेटिअरमध्ये गोंड लोक तामिळ, कन्नड आणि तेलगू या कुळातील द्रविडी भाषा बोलतात असे म्हटले आहे. परंतु ग्रिर्यसन यांनी या संदर्भात गोंडी तेलगूपेक्षा तामिळ व कन्नड या भाषेच्या जवळ असल्याचे म्हटले आहे. हेमेनडार्फ म्हणतात की द्रविडीयन भाषा, जी दक्षिण भारताच्या आर्यपूर्व सुसंस्कृत प्रतिनिधीक जगताशी सांघड घालणारी आहे. यांनी आपल्या दुसऱ्या लेखात Gondi Language an Unwritten Dravidian Tongue[१९] म्हणजे गोंडी ही अलिखीत द्रविडीयन बोलीभाषा आहे. असे म्हटले असुन गोंडी भाषा हीच त्याच्या जमातीच्या सर्वच सभासदांना शक्तिशाली दुवा होती असे त्यांना वाटते.

गोंडी भाषेचे प्राचिनत्व नाकबूल करता येत नाही. आदिवासी संशोधक व्यंकटेश आत्राम यांनी म्हटल्याप्रमाणे, गोंडी भाषा हीच मराठीची जननी आहे.[२०] गोंडी साहित्याचे अभ्यासक मोतीराम कंगाली यांच्या मते प्राचीन काळी गोंडी भाषा गोंडवन राज्याची राजभाषा होती आणि तिची स्वत:ची लिपी व्याकरण आणि साहित्य हे सर्व काही आज उपलब्ध आहे. तर के. ब. मरस्कोल्हे यांनी म्हटले आहे की, हिमालय आणि आल्पस पर्वताच्या जन्माच्या आधी आणि दक्षिण गोलार्धातील दक्षिण अमेरिका, आफ्रिका, अंटार्टिका, भारत व आस्ट्रेलिया हे पंचखंड एकमेकांच्या जवळ होते. याच पंचखंडाना अजूनही गोंडवन लँड म्हणून संबोधले जाते. ह्या पंचखंडातील जी सर्वांना समजणारी अशी समान भाषा होती, ती गोंडीच होय. भुजंग मेश्राम यांनी गोंडी भाषेला 'वेदपूर्व काळातील भाषा होय' असे म्हटले आहे. ह्यावरून गोंडी भाषा ही अनार्य लोकांची भाषा असून प्राचिनतम भाषा होय. असाच निष्कर्ष निघतो.[४०]

**निष्कर्ष**

गोंड ही एक आदिवासी जमात आहे. गोंड जमातीचे वास्तव्य अतिप्राचीन काळापासुन या भागात होते. नर्मदेपासुन दक्षिणेस गोदावरीपर्यंत व पूर्वेस छतिसगडपासून पश्चिमेस खानदेशापर्यंत या राज्यात विस्तार होता. गोंड जमातीमध्ये जी समाजरचना आढळून येत होती ती विशेषत: देव पद्धतीवर आधारीत होती. या देवपद्धतीला अनुसरूनच गोंड जमातीचे सामाजिक रितीरिवाज पार पडत होते. गोंड जमातीचा धर्म हा प्रथा परंपरा व धार्मिक विचारांवर आधारलेला होता. गोंड जमातीचे लोक वेगवेगळ्या देवतांची पुजा करीत होते. गोंड जमातीच्या सम्पूर्ण जीवनावर धर्माचा पगडा होता. गोंड जमातीचे सांस्कृतिक जीवन वैशिष्ट्यपूर्ण होते. त्यांच्या सांस्कृतिक जीवनात

वेगवेगळ्या प्रकारचे नृत्य, लोकगीते, वाद्ये, पोषाख त्यांचे खानपान राहणीमान, सण, उत्सव, तसेच रूढी प्रथा परंपरा आणि त्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या कला मधुन दिसून पडत.

यावरून असे लक्षात येते की, नागपूर जिल्ह्यातील गोंड जमातीचे सामाजिक जीवन, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनावरून गोंड जमातीचा सांस्कृतिक इतिहास वैशिष्ठ्यपूर्ण होता असे निदर्शनास येते.

## संदर्भसूची

१.डॉ. श. गो. कोलारकर, गो. मा. पुरंदरे नागपूर राज्याचा प्राचीन इतिहास पृष्ठ क्र. ७६ व ८६
२.काळे य. मा., “नागपूरकर भोसल्यांचा इतिहास” नागपूर, १९६९, पृ. १.
३.तुमराम विनायक, “आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा” नागपूर, १९९४, पृ. २.
४.आत्राम व्यंकटेश, “गोंडी संस्कृतीचे संदर्भ” नागपूर, १९८९, पृ.२.
५.तुमराम विनायक, पूर्वोक्त, पृ.१.
६.देवगावकर शैलजा, माडीय गोंडाची बोली, लोकसाहित्य व संस्कृती, चंद्रपूर,पृ.१५.
७.जूलमे दिनबंधू, माणिकगड—गडचांदूरचा प्राचीन इतिहास, चंद्रपूर, १९९८,पृ.४.
८.Russell R. V., 1916 Tribes and Castes of the Central Provinces of India, Delhi, P.43
९.Grierson G. N. “Linguistic Survey of India (Reprint 1967) Vol. IX, Munda and Droavidian Languages, Delhi, 1906, P. 472
१०.Crooke W. (1974) ‘Tribes and Castes of the Western India, Vol. II, P. 431
११.ठाकूर अशोक जयराजसिंह, “गोंडकालीन चंद्रपूर” चंद्रपूर, पृ.१२.
१२.Venkatachar C. S., Census of India 1931, Vol. I India, Note by P. 63
१३.संकलिया ही. हंसमुख, ‘सालवृक्ष गोंड आकण लंकेचे स्थान’ दैनिक लोकसत्ता, १९७६, पृ.२.
१४.अवस्थी राजेंद्र, मोहीम इंद्रावतीची, ग्रंथाली, मुंबई, १९८३, पृ. १३०, १३१.
१५.कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, पूणे, पृ. ११०
१६.गोडबोल जगदीश, मोहीम इंद्रावतीची, ग्रंथाली, मुंबई, १९८३, पृ. ५६.
१७.राजुरकर अ.ज.,“चंद्रपूरचा इतिहास”नागपूर,पृ. ९७.
१८.तुमराम विनायक, पूर्वोक्त, पृ. २०
१९.साळुंके संजय, ‘गोंड’ संवेदन प्रकाशन, पृ. २६.
२०.आत्राम व्यंकटेश, गोंडी भाषेचे प्राचिनत्व हाकरा, अंक तीन व चार पूणे, १९८२, पृ. २९.
२१.तुमराम विनायक, पूर्वोक्त, पृ. २९.